महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २०८ वा | दिनांक : ११/०६/२०२५ | वार : बुधवार




## नितेश राणेंच्या विधानाचे मंत्रिमंडळ बैठकीत पडसाद



**मुंबई :** भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी धाराशिव येथे संवाद मेळाव्यात केलेल्या भाषणात, स्थानिक शिवसेना नेत्यांना उद्देशून "भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप बसलेला आहे," असे विधान केले होते. या वक्तव्याचे महायुतीत तीव्र पडसाद उमटले असून, शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीतही यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. यानंतर तुमच्या मनात काहीही असेल, पण कुणाचाही बाप काढणे योग्य नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितेश राणे यांना खडसावले.

नितेश राणे यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वारंवार अडचणींचा सामना करावा लागत आहे. धार्मिक तेढ निर्माण करणारी विधाने केल्यामुळे आणि नागपूर येथील हिंसाचारानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितेश राणे यांना समज दिली होती. धाराशीव येथील मेळाव्यातील वक्तव्याचे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले.

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत नितेश राणेंच्या 'बाप' वक्तव्याचा मुद्दा उपस्थित झाला. शिवसेनेच्या मंत्र्यांनी "आमचा बाप बाळासाहेब ठाकरे आहेत, तुमचा कोण?" असा थेट सवाल करत राणेंच्या विधानावरून नाराजी व्यक्त केली. त्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नितेश राणे यांच्याकडे नाराजी व्यक्त करत, "या प्रकारचे बोलणे टाळले पाहिजे," असा सल्ला दिला. तसेच, कुणाचाही बाप काढणे योग्य नाही, संबंधित मंत्र्यांशी मी बोललो, ते म्हणाले माझा बोलण्याचा तसा अर्थ नव्हता, पण मी त्यांना सांगितले, तुमच्या मनात जो काही अर्थ असेल त्यापेक्षा जे परसेप्शन जाते ते राजकारणात महत्त्वाचे असते, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली.

धाराशिव जिल्हा नियोजन समितीमधील निधीवाटपाला मिळालेल्या स्थगितीवरून भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी घटकपक्षांवर जोरदार हल्ला चढवला होता. "कुणी कितीही ताकद दाखवली, कसेही नाचले तरी सगळ्यांचा बाप म्हणून भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री बसलाय हे लक्षात ठेवा," अशा शब्दांत राणे यांनी स्थानिक शिवसेना नेत्यांना दम भरला होता. "सगळ्यांचा बाप म्हणून भारतीय जनता पार्टीचाच मुख्यमंत्री बसलाय, हे सगळ्यांनी लक्षात ठेवा. कुणी कितीही ताकद दाखवली, कोणीही कसेही नाचले तरी देशात भाजपचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असल्याचं लक्षात ठेवा, अशी धमकीच नितेश राणेंनी स्थानिक शिवसेनेच्या नेत्यांना दिली होती.

नितेश राणे यांनी धाराशिवमध्ये केलेल्या वक्तव्यामुळे शिंदे गटाचे आमदार नीलेश राणे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली. "नितेशने जपून बोलावे.. मी भेटल्यावर बोलेनच परंतु बोलताना भान ठेवून बोलले पाहिजे, असे या पोस्टमध्ये त्यांनी म्हटल होते. यावर नितेश राणे यांनी देखील जशास तसे प्रत्युत्तर देत निलेश राणेंना उद्देशून म्हणाले, निलेशजी तुम्ही टॅक्स फ्री आहात. या पोस्टसची समाजमाध्यमे आणि प्रसारमाध्यमांवर चर्चा सुरू झाल्यानंतर काही वेळाने दोन्ही नेत्यांनी त्यांची पोस्ट डिलीट केल्या.

## आता मद्यप्रेमींच्या खिशाला बसणार झळ



**मुंबई :** काही दिवसांपूर्वी देशात बिअरचे दर कमी होतील अशा बातम्यांमुळे मद्यप्रेमींना आनंद झाला होता. मात्र, आता राज्य सरकारने उत्पादन वाढवण्याच्या दृष्टिकोनातून दारूविक्रीवरील कर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे मद्यप्रेमींच्या खिशाला मोठी झळ बसणार असून, त्यांचं "सेलिब्रेशन"ही महागणार आहे.

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत IMFL (भारतीय बनावटीचे विदेशी मद्य) विक्रीवर कर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. या शुल्कवाढीमुळे राज्याच्या तिजोरीत १४००० कोटी रुपयांचा महसूल वाढणार आहे.

मद्यपींना आता एका क्वार्टरसाठी (१८० मिली) ८० ते ३६० रुपये मोजावे लागतील. यामध्ये, देशी दारू १८० मिलीसाठी ८० रुपये असेल, तर विदेशी प्रीमियम ब्रँड १८० मिलीसाठी ३६० रुपये मोजावे लागतील.

राज्याच्या महसुलात वाढ करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने हा निर्णय घेतला आहे. भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावर (IMFL) दीड टक्क्याने वाढ करण्यात आली असून, विदेशी मद्यावरही हा कर वाढवण्यात आल्याने आता मद्यप्रेमींसाठी हा निर्णय आर्थिकदृष्ट्या अडचणीचा ठरणार आहे.

देशी मद्य- ८० रुपये (१८० मिली) महाराष्ट्र मेड लिकर - १४८ रुपये (१८० मिली) भारतीय बनावटीचे विदेशी मद्य - २०५ रुपये (१८० मिली) विदेशी मद्याचे प्रमीयम ब्रॅण्ड- ३६० रुपये (१८० मिली)

दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या उपायांना आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या विभागाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने सचिवस्तरीय अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. या गटाने मद्यनिर्मिती धोरण, अनुज्ञप्ती, उत्पादन शुल्क तसेच कर संकलन वाढीसाठी इतर राज्यातील राबविण्यात येत असलेल्या चांगल्या पध्दतींचा, धोरणात्मक बाबींचा अभ्यास करुन शासनास शिफारशी व अहवाल सादर केला. त्या अनुषंगाने उत्पादन शुल्क विभागाच्या सुधारित आकृतीबंधास तसेच विभागाचे एकात्मिक नियंत्रण कक्ष उभारण्यास मान्यता देण्यात आली.

या कक्षाच्या माध्यमातून एआय प्रणालीद्वारे राज्यातील आसवन्या, मद्य निर्माणी, घाऊक विक्रेते आदींचे नियंत्रण करण्यात येणार आहे. विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार मुंबई शहर व उपनगरात एक नवीन विभागीय कार्यालय व मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर व अहिल्यानगर या सहा जिल्ह्यांकरिता प्रत्येकी एक वाढीव अधीक्षक कार्यालय नव्याने सुरू करण्यात येणार आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बळकटीकरणासाठी ७४४ नवीन पदे व पर्यवेक्षीय स्वरूपाची ४७९ पदे अशा १ हजार २२३ पदांच्या सुधारित आकृतीबंध मान्यता देण्यात आली. विभागासाठी या विविध उपाययोजना राबवल्यानंतर मद्यावरील उत्पादन शुल्क व विक्री कराच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे १४ हजार कोटींची महसूल वाढ अपेक्षित आहे.

## माझ्या केसाला जरी धक्का लागला त्यास अजित पवार जबाबदार - लक्ष्मण हाके

**पुणे :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर त्यांनी काही दिवसांपूर्वी टीका केली होती. अजित पवारांनी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याचा गंभीर आरोपही केला होता. त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पदाधिकारी तसेच आमदारांनी हाकेंवर पलटवार केला. आता आज देखील लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर निशाणा साधला आहे.

माझ्या केसाला जरी धक्का लागला तर त्यास पवार कुटुंब, अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील, असा थेट इशाराच त्यांनी दिला आहे. लक्ष्मण हाके यांनी पोस्ट करत अजित पवारांवर टीका केली आहे. ते म्हणाले, मला रोज महाराष्ट्रातून राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचे धमक्या मिळू लागल्या असून मी गावगाड्यातील मेंढपाळाचा पोरगा आहे मी अशा धमक्यांना भीक घालत नाही. मात्र माझ्या केसाला जरी धक्का लागला तरी त्यास पवार कुटुंबीय अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, अजितदादा तुमच्या पिसाळलेल्या कुत्र्यांना आवर घाला. जर माझ्या केसाला धक्का लागला तर तुम्हाला रस्त्यावर आणू. मी गोरगरीब ओबीसी समाजासाठी आणि त्यांच्या हक्क अधिकारांसाठी लढत असून अर्थ खात्याला गोचीडासारखा चिटकून बसलेला अजित पवार हा ओबीसी समाजाचा निधी देत नसल्याने माझा त्यांच्याशी वाद आहे, असे ते म्हणाले.

ओबीसी समाजाचा अडवलेला निधी देण्याऐवजी राष्ट्रवादीचे पदाधिकारी नागपूर पासून पंढरपूर पर्यंत ज्या पद्धतीने धमक्या येऊ लागल्या आहेत ते पाहता माझ्यावर असा हल्ला झाल्यास या संपूर्ण पवार कुटुंब जबाबदार असेल, असा इशारा हाके यांनी दिला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ जून २०२५


## पोलिस निरीक्षक गणेश पिसाळ यांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद



**भंडारा :** प्रतिनिधी – भंडारा ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गणेश पिसाळ यांच्या कार्यशैलीचे आणि प्रशासन व्यवस्थापनाचे पालकमंत्री श्री. सावकारे, खासदार श्री. पडोळे, आमदार श्री. भोंडेकर, जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांनी विशेष कौतुक केले.आज आयोजित सदिच्छा भेटीदरम्यान, वरील मान्यवरांनी पोलीस ठाण्यास भेट दिली आणि इमारतीची स्वच्छता, नागरिकाभिमुख व्यवहार, तसेच दक्षता आणि नियोजनबद्ध कामकाजाचे खास निरीक्षण केले. "या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला समाधान आणि सकारात्मक अनुभव मिळतो," असे गौरवोद्गार मान्यवरांनी व्यक्त केले.याच कार्यक्रमात, भंडारा ग्रामीण पोलीस स्टेशनला ISO प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले, ज्याचा सन्माननीय हस्ते पालकमंत्री श्री. सावकारे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पोलिस निरीक्षक गणेश पिसाळ यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना या यशाबद्दल स्तुत्य गौरव करण्यात आला.शिस्तबद्ध कार्यपद्धती, गुन्हेगारीवर नियंत्रण, आणि सामाजिक भान जपणाऱ्या पोलीस यंत्रणेचा आदर्श उदाहरण म्हणजे गणेश पिसाळ यांचे नेतृत्व, असे मान्यवरांनी सांगितले.सामाजिक कार्य व पोलिसिंगचा सुंदर समन्वय घडवणाऱ्या या कार्यासाठी जिल्ह्याचे नागरिकही पोलिस निरीक्षक पिसाळ यांना मन:पूर्वक शुभेच्छा देत आहेत.

## वटपौर्णिमा केवळ श्रद्धेचा विषय नसून त्यामागे आरोग्य, पर्यावरण, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांचे सुसंगत विज्ञान दडलेले आहे



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** वटपौर्णिमा हा सण ज्येष्ठ पौर्णिमेला साजरा होत असून यामागे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व आहे. पौराणिक कथेनुसार, वटपौर्णिमेच्या दिवशी सावित्रीची निष्ठा, श्रद्धा, आणि धैर्यामुळे यमराज प्रभावित झाले आणि सत्यवानाला जीवनदान दिले. वडाच्या झाडाला त्रिदेवांचे म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे रूप मानले जाते. एवढेच नसून, त्यामागे वैज्ञानिक दृष्टिकोन सुद्धा आहे. वटपौर्णिमा हा सण केवळ श्रद्धेचा विषय नसून त्यामागे आरोग्य, पर्यावरण, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांचे सुसंगत विज्ञान दडलेले आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ संजय अस्वले याप्रसंगी केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय ग्रीन क्लब अंतर्गत वटपौर्णिमेचे औचित्य साधून वटवृक्षाचे रोपण आणि पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अस्वले यांच्या हस्ते करण्यात आले वड (वटवृक्ष) हा २४ तास ऑक्सिजन सोडतो (रात्रीही), जे इतर झाडांमध्ये विरळच असते. म्हणून त्याच्या झाडाखाली बसणे हे प्राणवायू मिळवण्याच्या दृष्टीने लाभदायक असते. वडाच्या सालीपासून, दूध (latex), पाने, पारंब्या आणि मुळांपासून अनेक आयुर्वेदीक औषधे तयार केली जातात. स्त्रियांचा वडाच्या झाडाभोवती सूत गुंडाळून प्रदक्षिणा घालताना जमिनीशी थेट संपर्क होत असल्याने नकारात्मक ऊर्जा कमी होते आणि मन:शांती मिळते आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. महिलांचा एकत्र येऊन पूजा, कथा सांगणं, संवाद साधणं हे सुद्धा समूह मनोविज्ञान सुधारण्यास मदत करतं. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करून महाविद्यालयीन परिसरात वटवृक्षरोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, डॉ विनोद देवरकर, डॉ अशोक पदमपल्ले, डॉ धनंजय मेनकुदळे, श्री सतीश जगताप, नाईक श्री अनिल तुंगे आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विस्तार अधिकारी सोफी यांचा कन्नड केंद्रातर्फे सत्कार




**कन्नड (कृष्णा शिंदे) :** विस्तार अधिकारी सोफी यांचा कन्नड केंद्रातर्फे सत्कार करण्यात आला नवीन रुजू झालेले कन्नड तालुका विस्तार अधिकारी सोफी साहेबांचा आज सत्कार करण्यात आला कन्नड यावेळी केंद्रातील रेलचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे मकरंद पुर मुख्याध्यापक मधुकर पवार कोळसवाडीच्या मुख्याध्यापिका कमल सोनवणे कन्नड साखर कारखाना चे मुख्याध्यापक नामदेवराव पवार विषय तज्ञ कडुबा भुसारे आदि शिक्षक उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903

# वट सावित्री पूजा हा हिंदू विवाहित महिलांनी साजरा केलेला एक महत्त्वाचा सण







**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** वट सावित्री पूजा हा हिंदू विवाहित महिलांनी साजरा केलेला एक महत्त्वाचा सण आहे. त्या त्यांच्या पतीच्या दीर्घ आणि निरोगी आयुष्यासाठी हा सण साजरा करतात. दरवर्षी हा सण हिंदू महिन्यातील ज्येष्ठातील पौर्णिमा तिथीला साजरा केला जातो. मंगळवारी रोजी साजरा केला गेला. या शुभ दिवशी महिला उपवास करत आणि वट सावित्री पूजन केले. त्या नवीन कपडे आणि दागिने घालून भगवान यम, शिव आणि देवी पार्वतीला प्रार्थना केलीवट पौर्णिमेच्या दिवशी वडाची पूजा केल्याने अखंड सौभाग्यासह जीवनात अपार सुख आणि संपत्ती प्राप्त होते. त्यामुळे या दिवशी वट पौर्णिमेचा व्रत ठेवून विधिनुसार पूजा केल्यास खूप शुभ फळ मिळते. ज्याप्रमाणे वटवृक्षाचे आयुष्य खूप जास्त असते त्याचप्रमाणे पतीचे आयुष्यही खूप मोठे असावे, अशी वडाच्या झाडाची पूजा करण्यामागची धारणा असते. यावेळी परिसरातील दौलताबाद, अब्दीमंडी, शेरणापूर, मीटमीटा, पडेगाव, पोलीस कॉलोनी रस्त्यावर असलेल्या वडाच्या झाडाची पूजा करताना महिला दिसून आल्या एकमेकींना ओवाळून वान देत शुभेच्छा दिल्या

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

## दौलताबाद ग्रामपंचायत उपसरपंच पदी मतीन मुजीब सैय्यद यांची बिनविरोध निवड



**दौलताबाद (जावेद अहमद):** ग्रामपंचायत उपसरपंच पदाचा उपसरपंच जावेद शेख यांनी राजीनामा दिल्या नंतर रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्याचे रोजी आदेश पारित केले होते त्या अनुषंगाने दि १० जून मंगळवारी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात आलीअध्यासी अधिकारी म्हणून मंडळ अधिकारी गणेश सोनवणे हे होतेउपसरपंच पदासाठी मतीन मुजीब सैय्यद यांचे एकमेव अर्ज दाखल झाले असल्याने दोन वाजता सरपंच शबाना करीम शेख यांच्या उपस्थितीत मतीन सैय्यद यांना उपसरपंच म्हणून अधिकारी गणेश सोनवणे यांनी जाहीर केलेयावेळी ग्रामपंचायत सदस्य मुन्नी बाजी,दीपक घुसळे, सैय्यद शेरू, किशोर जाधव,जावेद शेख, सतीश जाधव,योगेश पाढळे, अश्विनी पेरकर,सुनीता आढाव, अश्विनी साळवे,कांताबाई देशमुख,कुसुम तुपे,यांची प्रमुख उपस्थिती होतीनिवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी ए सी पटेल,ग्राम महसूल अधिकारी सूरज गिरी यानी मदत केलीमाजी पंचायत समिती सदस्य सैय्यद जीलानी, माजी सरपंच संजय कांजूने,सैय्यद हारून, रामदास इंगळे ,शेख बने,दादासाहेब म्हस्के ग्रामस्थ आदींनी अभिनंदन केले आहे

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ जून २०२५


# AI क्षेत्रामध्ये करिअरच्या वाटा




आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (Artificial Intelligence AI) हे क्षेत्र अतिशय वेगाने विकसित होत आहे.AI मुळे उद्योग, शिक्षण, आरोग्यसेवा, वित्त, आणि मनोरंजन यांसारख्या क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडत आहेत. गणित, संगणक विज्ञान आणि डेटा विश्लेषण यांचा पाया असलेल्या AI मध्ये करिअरच्या संधी प्रचंड विस्तृत आणि आकर्षक आहेत. त्यामुळे या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि व्यावसायिकांसाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत.AI क्षेत्रातील संधी, आवश्यक कौशल्ये, शैक्षणिक पार्श्वभूमी, विविध भूमिका, उद्योगातील मागणी आणि भविष्यातील दिशा यांचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे काय?**

AI म्हणजे अशी प्रणाली जी मानवीबुद्धीची नक्कल करते — उदा. विचार करणे, शिकणे, निर्णय घेणे, समस्या सोडवणे, भाषेची समज, प्रतिमा ओळखणे इत्यादी. मशीन लर्निंग (ML), डीप लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग (NLP), कॉम्प्युटर व्हिजन, रोबोटिक्स ही AI ची उपशाखा आहेत.

1. **AI क्षेत्रातील करिअरचे पर्याय** AI क्षेत्रात अनेक प्रकारच्या भूमिका उपलब्ध आहेत, ज्या तांत्रिक आणि गैरतांत्रिक अशा दोन्ही स्वरूपाच्या आहेत. खाली काही प्रमुख करिअर पर्याय दिले आहेत: **मशिन लर्निंग इंजिनिअर काम :** मशिन लर्निंग मॉडेल्स डिझाइन करणे, प्रशिक्षित करणे आणि लागू करणे. यामध्ये डेटा प्रीप्रोसेसिंग, मॉडेल ऑप्टिमायझेशन आणि डिप्लॉयमेंट यांचा समावेश होतो. **आवश्यक कौशल्ये :** Python,TensorFlow, PyTorch, लिनियर अलजेब्रा, सांख्यिकी, आणि डेटा सायन्स. **क्षेत्र :** स्वायत्त वाहने, चेहरा ओळख प्रणाली, आणि शिफारस प्रणाली (Recommendation Systems). **पगार :** भारतात मशिन लर्निंग इंजिनिअरचा सरासरी पगार वार्षिक 820 लाख रुपये आहे, अनुभव आणि कंपनीनुसार जास्त असू शकतो. **डेटा सायंटिस्ट काम :** डेटाचे विश्लेषण करून व्यवसायासाठी अंतर्दृष्टी (Insights) काढणे आणि AI मॉडेल्स तयार करणे. **आवश्यक कौशल्ये :** सांख्यिकी, डेटा विश्लेषण, SQL, Python, आणि मशिन लर्निंग अल्गोरिदम्स. **क्षेत्र :** ईकॉमर्स, फिनटेक, आणि मार्केटिंग.

**पगार :** भारतात डेटा सायंटिस्टचा सरासरी पगार 615 लाख रुपये वार्षिक आहे. **AI संशोधक काम :** नवीन AI अल्गोरिदम्स, मॉडेल्स आणि तंत्रज्ञान विकसित करणे. यामध्ये शुद्ध संशोधन आणि नवीन शोधांचा समावेश होतो. **आवश्यक कौशल्ये :** गणित (लिनियर अलजेब्रा, कॅल्क्युलस, प्रोबॅबिलिटी), प्रोग्रामिंग, आणि पीएच.डी. (काहीवेळा आवश्यक). **क्षेत्र :** Google Research, Microsoft Research, किंवा ISRO सारख्या संस्था. **पगार :** संशोधकांचा पगार अनुभव आणि संस्थेनुसार 1030 लाख रुपये वार्षिक असू शकतो. **नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग (NLP) तज्ज्ञ काम :** चॅटबॉट्स, व्हॉइस असिस्टंट्स (उदा., Siri, Alexa), आणि भाषांतर प्रणाली विकसित करणे. **आवश्यक कौशल्ये :** NLP अल्गोरिदम्स, डीप लर्निंग, Python, आणि लिंग्विस्टिक्सचे ज्ञान. **क्षेत्र :** ग्राहक सेवा, भाषांतर सॉफ्टवेअर, आणि सोशल मीडिया विश्लेषण. **पगार :** भारतात NLP तज्ज्ञांचा पगार 1025 लाख रुपये वार्षिक आहे. **रोबोटिक्स इंजिनिअर काम :** AIआधारित रोबोट्स आणि ऑटोमेशन सिस्टम्स डिझाइन आणि विकसित करणे. **आवश्यक कौशल्ये :** रोबोटिक्स, मशिन लर्निंग, सेंसर तंत्रज्ञान, आणि प्रोग्रामिंग. **क्षेत्र :** मॅन्युफॅक्चरिंग, आरोग्यसेवा, आणि संरक्षण. **पगार :** रोबोटिक्स इंजिनिअरचा पगार 820 लाख रुपये वार्षिक आहे. **AI प्रॉडक्ट मॅनेजर काम :** AI उत्पादनांचे डिझाइन, विकास आणि मार्केटिंग यांचे व्यवस्थापन करणे. **आवश्यक कौशल्ये :** तांत्रिक ज्ञान, व्यवसाय समज, आणि संवाद कौशल्ये. **क्षेत्र :** टेक स्टार्टअप्स, Google, Amazon सारख्या कंपन्या. **पगार :** भारतात AI प्रॉडक्ट मॅनेजरचा पगार 1230 लाख रुपये वार्षिक आहे. **AI एथिक्स तज्ज - काम :** AI च्या नैतिक वापरावर लक्ष ठेवणे, बायस कमी करणे, आणि कायदेशीर नियमांचे पालन करणे. **आवश्यक कौशल्ये :** AI चे तांत्रिक ज्ञान, कायदा, आणि नैतिक तत्त्वज्ञान. **क्षेत्र :** सरकारी संस्था, टेक कंपन्या, आणि संशोधन संस्था. 2. **AI क्षेत्रातील प्रमुख उद्योग** AI चा वापर खालील उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात होतो, ज्यामुळे करिअरच्या संधी वाढतात. **आरोग्यसेवा :** रोगनिदान, वैयक्तिकृत उपचार, आणि डेटा विश्लेषण. **वित्त :** फसवणूक शोधणे, क्रेडिट स्कोअरिंग, आणि ट्रेडिंग अल्गोरिदम्स. **ईकॉमर्स :** शिफारस प्रणाली, ग्राहक विश्लेषण, आणि इन्व्हेंटरी मॅनेजमेंट. **ऑटोमोटिव्ह :** स्वायत्त वाहने आणि ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टम्स. **मनोरंजन :** गेमिंग, स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म्स (Netflix, Spotify), आणि कंटेंट क्रिएशन. **संरक्षण :** सायबर सिक्युरिटी, ड्रोन तंत्रज्ञान, आणि रणनीती विश्लेषण. 3. **आवश्यक शिक्षण आणि कौशल्ये** AI क्षेत्रात यशस्वी करिअरसाठी खालील गोष्टी महत्त्वाच्या आहेत. **शैक्षणिक पात्रता :** गणित, संगणक विज्ञान, किंवा डेटा सायन्समधील बी.टेक., बी.एस्सी., एम.एस्सी., किंवा पीएच.डी. AI, मशिन लर्निंग, किंवा डेटा सायन्समधील डिप्लोमा किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम. **तांत्रिक कौशल्ये : प्रोग्रामिंग :** Python, R, Java, C++. **सॉफ्टवेअर टूल्स :** TensorFlow, PyTorch, Scikitlearn, Keras, SQL. **गणित :** लिनियर अलजेब्रा, कॅल्क्युलस, प्रोबॅबिलिटी, आणि सांख्यिकी. **अल्गोरिदम्स :** मशिन लर्निंग आणि डीप लर्निंग अल्गोरिदम्स. **सॉफ्ट स्किल्स :** विश्लेषणात्मक विचार, समस्या सोडवण्याची क्षमता, आणि संवाद कौशल्ये.

सतत शिकण्याची तयारी, कारण AI क्षेत्र सतत विकसित होत आहे. 4. **AI मधील करिअरचे फायदे उच्च मागणी :** AI तज्ज्ञांना जगभरात प्रचंड मागणी आहे. भारतात टेक कंपन्या, स्टार्टअप्स, आणि MNCs मध्ये AI व्यावसायिकांची गरज वाढत आहे. **आकर्षक पगार :** AI क्षेत्रातील पगार इतर क्षेत्रांच्या तुलनेत जास्त आहे, विशेषतः डेटा सायन्स आणि मशिन लर्निंगमध्ये. **वैविध्यता :** AI मधील कौशल्ये अनेक उद्योगांमध्ये लागू होतात, ज्यामुळे करिअर लवचिक आहे. **नाविन्य :** AI मध्ये काम करणे म्हणजे नवीन तंत्रज्ञान आणि शोधांचा भाग बनणे. **जागतिक संधी :** Google, Amazon, Microsoft, आणि Tesla सारख्या कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी. 5. **आव्हाने स्पर्धा :** AI क्षेत्रात प्रवेशासाठी तीव्र स्पर्धा आहे, कारण जगभरातील व्यावसायिक या क्षेत्रात येत आहेत. **सतत शिकणे :** तंत्रज्ञान सतत बदलत असल्याने नवीन कौशल्ये शिकावी लागतात. **जटिलता :** AI मॉडेल्स समजून घेणे आणि विकसित करणे जटिल असू शकते. **नैतिक प्रश्न :** AI च्या वापरामुळे गोपनीयता, बायस, आणि नोकरी गमावण्यासारखे प्रश्न निर्माण होतात. 6. **भारतातील AI करिअरच्या संधी** भारतात AI क्षेत्र वेगाने वाढत आहे. बेंगळुरू, मुंबई, दिल्ली, आणि हैदराबाद यांसारख्या शहरांमध्ये AI स्टार्टअप्स आणि MNCs ची संख्या वाढत आहे. काही प्रमुख कंपन्या आणि संस्था: **कंपन्या :** Google India, Amazon, Microsoft, Infosys, TCS, Wipro. **स्टार्टअप्स :** Haptik, Niki.ai, Mad Street Den. **संशोधन संस्था :** IISc बेंगळुरू, IITs, आणि Indian Statistical Institute (ISI). 7. **AI मध्ये करिअर कशी सुरू करावी?** 1. **शिक्षण :** गणित, संगणक विज्ञान, किंवा डेटा सायन्समधील पदवी घ्या. 2. **ऑनलाइन कोर्सेस :** Coursera, Udemy, edX वर AI आणि मशिन लर्निंगचे कोर्सेस करा. 3. **प्रोजेक्ट्स :** GitHub वर प्रोजेक्ट्स तयार करा, जसे की डेटा विश्लेषण किंवा चॅटबॉट डेव्हलपमेंट. 4. **इंटर्नशिप्स :** स्टार्टअप्स किंवा टेक कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करा. 5. **नेटवर्किंग :** LinkedIn आणि AI समुदायांशी जोडले जा. 8. **भविष्यातील संधी जेनरेटिव्ह AI :** Chat GPT, DALLE सारख्या तंत्रज्ञानामुळे जेनरेटिव्ह AI मध्ये संधी वाढत आहेत. **AI इन हेल्थकेअर :** रोगनिदान आणि वैयक्तिकृत उपचारांमुळे आरोग्यसेवेत AI ची मागणी वाढेल. **स्वायत्त तंत्रज्ञान :** स्वायत्त वाहने आणि ड्रोन यांचा विकास वाढत आहे.

**AI एथिक्स :** AI च्या नैतिक वापरावर लक्ष केंद्रित करणाऱ्या भूमिका वाढतील. आर्टिफिशियल इंटेलिजन्स AI हे २१व्या शतकातील सर्वात महत्त्वाचे आणि क्रांतिकारी तसेच भविष्य घडवणारे क्षेत्र आहे, यामध्ये करिअर करणाऱ्यांसाठी ज्ञान, कौशल्य आणि जिज्ञासा या तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत.ज्यामध्ये करिअरच्या संधी प्रचंड आणि वैविध्यपूर्ण आहेत. जर तुम्ही सतत शिकण्याची तयारी ठेवली, तर गणित, प्रोग्रामिंग, आणि विश्लेषणात्मक कौशल्ये असलेल्या व्यक्तींसाठी हे क्षेत्र अत्यंत आकर्षक आहे.तसेच तांत्रिक कौशल्य विकसित केली आणि समस्यांवर उपाय शोधण्याची वृत्ती ठेवली, तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स तुमच्यासाठी एक उत्तम करिअरचा मार्ग ठरू शकतो.


**योगेश्वर दत्तात्रय निकम**
महाराष्ट्र हिंदी विद्यालय
शहागंज,छत्रपती संभाजीनगर
94228 09841



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002